# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक ०९/०७/२०२४ (मंगळवार) सकाळ

---

### पो.स्टे. नरखेड हद्दीमधील येथील जुगार अड्डयावर धाड
### —: नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक ०८/०७/२०२४ रोजी पोस्टे नरखेड येथील स्टाफ पोस्टे हद्दीत अवैध धंद्यावर रेड संबंधाने पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, पोलीस स्टेशन नरखेड हद्दीतील मौजा बेलोना शिवारात भरतु पटेल यांच्या शेताजवळ पांदन रस्त्यात काही लोक ५२ तासपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत असल्याची गोपनिय माहीती पोस्टे नरखेड येथील स्टाफ यांना प्राप्त झाले वरून सदर स्टाफ यांनी मौजा बेलोना शिवारात भरतु पटेल यांच्या शेताजवळ सापळा रचुन छापा टाकुन **आरोपी नामे— धनराज उकंडराव चरपे, वय २९ वर्ष, रा. बेलोना ०२) नरेश भाउरावजी सावरकर, वय ३० वर्ष, ०३) यादव गणपतरावजी अलोने, वय ४० वर्ष, ०४) किशोर लक्ष्मण बारमासे, वय २८ वर्ष, ०५) तुळशीराम बाबुरावजी वघाळे, वय ४० वर्ष, सर्व रा. बेलोना तह नरखेड** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. एकुण ०५ जुगारी इसम यांना ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यातुन नगदी १००००/— रूपये, १५ फुट लांब व ०६ फुट रूंदी ताडपतरी किंमती ८००/—रू. व हातात १५ तासपत्ते डावावर ३७ तास पत्ते असा एकुण १०,८००/—रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीतांविरूध्द पोलीस ठाणे नरखेड कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

तसेच अंबोला शिवार नरखेड येथे खाली जागेत ५२ ताशपत्त्यावर हारजितचा जुगार खेळणारे **आरोपी १) राजेंद्र माधवराव मोहीतकर, वय ६० वर्ष ०२) अफसर पिर मोहंमद शेख, वय ४५ वर्ष ०३) सेवकराम लक्ष्मण बावणे वय ३७ वर्ष, ०४) भुषन अशोक धकिते , वय २९ वर्ष ०५) राकेश उईके, वय ४१ वर्ष सर्व रा नरखेड** हे जुगार खेळतांनी मिळुन आले. आरोपींना ताब्यात घेवुन त्यांच्या ताब्यातून नगदी ४००० रूपये व खुले तासपत्ते डावावर ४५ तास पत्ते असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## पोस्टे बेला हद्दीमधील सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

पोस्टे बेला अंतर्गत मौजा बेला टावुन येथे दि. ०८/०७/२०२४ चे १२/३० वा. ते १३/२० वा. दरम्यान यातील **आरोपी नामे– किशोर सुर्यभान झगडे वय ४० वर्ष रा. बेला वार्ड क्र. ०२ ता. उमरेड जि. नागपुर** हा सार्वजनीक ठिकाणी अवैद्यरित्या लोकांकडुन पैसे घेवुन एका कागदी चिरोटयावर वरळी मटक्याचे आकडे लिहून पैशाची बाजी लावुन हारजितचा जुगार खेळ खेळतांना मिळुन आला, त्याचे ताब्यातुन सट्टापट्टी साहीत्य व एक निळा शाहीचा पेन व नगदी कॅश ५२०/– रुपये असा एकुण ५२०/– रु. चा मुद्देमाल मिळुन आल्याने आरोपीविरूद्ध पोस्टे बेला येथे कलम १२ (अ) म.जु.का प्रमाणे कारवाई करण्यात आली. आरोपीस सुचनापत्रावर सोडण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे बेला येथील ठाणेदार सपोनि. अजित कदम, पोहवा दारासिंग राठोड, पोना निळकंठ पिंपळे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर